## १० आजारांचे सोपेपणावरून वर्गीकरण : (रोगनिदान)

| आजारांचा प्रकार | निदान सुलभता | उपचार सुलभता | सुरक्षितता | समाजातले आजारप्रमाण | या गटात येणारे काही आजार |
|---|---|---|---|---|---|
| साधे आजार * | +++ + (सोपे) | +++ + (सोपे) | ++++ (बिनधोक) | ++++ (सर्रास आढळणारे) | सर्दीपडसे, खरचटणे–कापणे, डोकेदुखी, बद्धकोष्ठ, अपचन, खरूज, गजकर्ण, जंत–कृमी उवा होणे,रांजणवाडी अंगदुखी इ. |
| मध्यम आजार ** | +++ साधारण | +++ साधारण | +++ साधारण | +++ साधारण | डोळे येणे, कान दुखणे–फुटणे, घसादुखी, टॉन्सिलसूज, जुलाब–हगवण, कावीळ, गोवर–कांजिण्या, जठरदाह, तोंड येणे, दातदुखी, कुपोषण, गळवे, हिवताप, रक्तपांढरी, रातांधळेपणा, मुडदूस, आमांश इ. |
| अल्पकालिन (आकस्मिक) गंभीर आजार *** | ++ (कमी) | ++ (कमी) | ++ (कमी) | ++ (कमी) | न्यूमोनिया, मेंदूसूज, पिसाळी, पोलिओ, लिंगसांसर्गिक आजार, सांधेसूज, जठरव्रण, मुतखडे, मूत्रसंस्थेचे जंतुदोष, झटके येणे, विषमज्वर,शोष, धोक्याचे गरोदरपण, धोक्याचे बाळंतपण इ. |
| दीर्घकालीन गंभीर आजार *** | ++ (कमी) | ++ (कमी) | ++ (कमी) | ++ (कमी) | क्षयरोग, कुष्ठरोग, सर्व प्रकारचे कर्करोग, सांधेकाळीज ताप, अतिरक्तदाब, मधुमेह,कुपोषण मोतीबिंदू, गलगंड, हत्तीरोग. |
| अपघात *** | + (अगदी कमी) | + (अगदी कमी) | ० (नाही) | + (अगदी कमी) | अन्नविषबाधा, सर्पदंश, विंचू चावणे, अपघाताने मार लागणे, जास्त प्रमाणात भाजणे, बुडणे इ. |

* साधारण आजार – यावर तुम्ही स्वतः उपचार करू शकाल.

** मध्यम आजार – उपचार करा, पण रुग्णावर लक्ष असू द्या. आवश्यक वाटल्यास डॉक्टरकडे पाठवा.

*** गंभीर आजार: लवकर डॉक्टरकडे पाठवा, मात्र काही आजारांच्या बाबतीत योग्य प्राथमिक उपचार करून डॉक्टरकडे पाठवलेले बरे.